# श्री दासबोधांतर्गत

# दशबोध

(संक्षिप्त दासबोध– प्रत्येक समासातील एकच ओवी)



REFBK-0022525
REFBK-0022525

सकलक

**कै. डॉ. रा. द. प्राणी**



५८७६
म. ग्रं. सं. ठाणें.
विषय काव्य
सं. क्र. २३८१

काव्य २३०९ ~~अध्यात्म~~
२२५२९ संदर्भ
९।१२।७८

# प्रस्तावना

भागवत ११।८।१०

## ।। सर्वतः सारमांदद्यात् ।।

**कै. डॉ. दादासाहेब प्राणी** हे महाराष्ट्रास विशेशतः **श्री समर्थप्रेमी** वाचकांस सुपरिचित आहेत. दोन भागांत प्रसिद्ध झालेंला त्यांचा "स्वाध्याय मनोबोध" पारमार्थिकांस मार्गदर्शक झाला आहे. **डॉ. दादा साहेबांचा** ग्रंथराज दासबोधाचा आभ्यासहि सखोल होता; त्यांची संपूर्ण दासबोधावरील प्रकट प्रवचने ऐकण्याचे भाग्य आम्हा मिरजकर मंडळीना लाभलेले आहे.

दासबोधांत अनेक विषय समर्थांनी **समर्थपणे** हताळले आहेत. त्या पैकी साधकाला ते कोणकोणते विषय अधिकांशाने उपयुक्त आहेत. तें **डॉ. दादासाहेब** यांनी निवडून दहा विषयांचा '**दशबोध**' संकलीत केला आहे. साधकांशी समरस होणाऱ्या व स्वतः साधनेत रमणाऱ्या डॉक्टर साहेबांना या दोनशे ओव्यावर स्वध्यायभाष्य करावयाचे होते असें वाटते; परंतु ते व्हायचे नव्हतें!

या **"दशबोधात"** दहा विषयांवरील समर्थांचे दासबोधान्तर्गत विचार एकत्रित केलेले दिसतात; प्रत्येक समासातील एकच ओवी घेण्याच्या संकल्पामुळे क्वचित् तुटकपणा जाणवतो. नवीन वर्गीकरणासाठी मूळ ओव्या संधर्भातून बाजूला काढून निराळ्या संधर्भात गोवल्याने संकीर्ण स्फुट सुभाषित संकलनाचे स्वरुप आल्यासारखे वाटते; पण त्या बरोबरच संपूर्ण ग्रंथराजाच्या नखशिखान्त अंगप्रत्यंगाचे दर्शन मिळाल्याचे समाधान लाभते. संकलनकारांनी स्वतःचे हृद्गत व्यक्त केले असतें तर बरें होते!
शास्त्रग्रंथ अनंत व अपार, आयुष्य अल्प, विघ्नें पुष्कळ त्यामुळे सारग्राहकता हवी आहे. ती डॉ. साहेबांच्या ठिकाणी उच्यांकानें सुप्रतिष्ठीत आहें असें या दशबोधावरुन कळन येंईल.

अभ्यासकांना ही निवड मार्गदर्शक होईल असा विश्वास वाटतो.

मिरज किल्ला
आषाढ वद्य १३।१८९८

**श्री हरेराम बाळकृष्ण बोडस**
मिरज.

# - अभिप्राय -

श्री. प. प. श्री वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज
व श्री. प. प. श्री लोकनाथतीर्थ स्वामी महाराज
स्मारक ट्रस्ट

REFBK-0022525
REFBK-0022525

श्री वासुदेव निवास,
४२।१७ कर्वे पथ, पुणे.
दि. २४।१०।१९७६

॥ श्री गणेश दत्तगुरुभ्यो नमः ॥

श्री. समर्थांच्या दासबोधाचे संक्षिप्त समालोचन 'दशबोध' या नावाने श्री. डॉ. दादासाहेब प्राणी यांनी केलेले, प्रकाशित केलें जात आहे ही अत्यंत आनंदाची गोष्ट आहे. मुक्तीस कारण असणाऱ्या अध्यात्मविद्येचे सांगोपांग स्वरुप गुरुबोध, भक्तिबोध इ. दशबोधाच्या रुपाने समर्थांच्या वचनात मांडण्याचा प्रयत्न लेखकाने कुशलतेने केलेला आहे. स्वाध्याय मनोबोध रुपाने श्री. दादासाहेबांची मनन शक्ती सर्वांना परिचीत आहेच. "अल्पाक्षल मसंदिग्धं सारवद्-विश्वतो मुखं" अशा सूत्रात्मक भाषेमध्ये प्राचीन महर्षींनी संक्षेपाने विचार मांडलेले आहेत.

तसेच वाद्ग्रंथ व आकग्रंथ हेही शास्त्रामध्ये असलेले दिसून येतात. विशेष महत्वाच्या सिद्धांतांचे निरिध्यासन करण्याकरता सूत्रात्मक ग्रंथ उपयुक्त ठरतात ज्यांची बुद्धी श्रवणमननाने विकसित झालेली आहे तेच अशा ग्रंथांचे मुख्य अधिकारी ठरतात. सामान्य जनांना विशेष विवरणाची आवश्यकता भासते. स्वाध्यायमनोबोधात ; सूत्रात्मक समार्थांचे मनाचे श्लोक व त्यावरील श्रीमान डॉ. प्राणी यांचे विवेचन असा दोघांचाही संगम झालेला आहे. तसेच विवेचनही या ग्रंथावर करण्याचा लेखकांचा संकल्प असावा; असो. एका मननशील ईशकृपा संपन्न लेखकाने दास बोध रत्नाकरातुन निवडून बाजूला काढलेली ही सूत्रभूत रत्ने ग्रंथरुपाने आज प्रकाशित होण्याचा सुयोग आलेला आहे. अधिकारी, रत्न पारखी, जिज्ञसूंना तर याचे अवलोकनाने संतोष वाटेलच पण अध्यात्म विद्यानदीच्या तीरापर्यंत येउन थांबलेल्या सामान्यजनांनाही या ग्रंथाच्या मननाने त्या नदोत अवगाहन करण्याचे सामर्थ्य प्राप्त होउन दास बोधासारख्या मूळ समुद्र स्थानीय विचारप्रवाहाकडे वळण्याची बुद्धी होउन हळू हळू ईशगुरुप्रसादाने त्रिधताप निर्मुक्त होता येईल. या योगाने प्रपंचाप्रमाणे परमार्थातही रोगनिर्मुक्त करण्यास समर्थ असलेल्या श्रीमान प्राणी डॉक्टरांच्या ईशदत्त बुद्धिशक्तीचे पूर्ण चीज होईल.

**दत्तात्रय धुंडीराजशास्त्री कवीश्वर**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २३०९ काव्य
२२५२५
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

१ तेथें (गुरुगीता) निरोपिलें बरवें ।
पार्वतीप्रती सदाशिवें ॥
या कारणें सद्‌भावें ।
सद्‌गुरुचरण सेवावें ॥७-१०-४४॥

२ असो जयासी मोक्ष व्हावा ।
तेणें सद्‌गुरु करावा ॥
सगुद्‌रुविण मोक्ष पावावा ।
हें कल्पांती न घडे ॥ ५-१-४४ ॥

३ म्हणोनि ज्ञान वैराग्य आणि भजन ।
स्वधर्मकर्म आणि साधन ॥
कथानिरुपण श्रवण मनन ।
नीति न्याय मर्यादा ॥ ५-२-५२

४ तया देहामध्यें नरदेहो ॥
त्या नरदेहांत ब्राम्हण देहो ॥
तया ब्राम्हण देहास पाहो ।
अधिकार वेदीं ॥ १०-२-१७ ॥

५ हृदईं वेदगर्भ विलसे ।
मुखीं सरस्वती विलसे ॥
साहित्य बोलता जैसे ।
भासती देवगुरु ॥ १-६-६ ॥

६ युक्तिवंत गुणवंत वरिष्ठ ।
बुद्धिवंत बहुधारिष्ट ॥
दीक्षावंत सदा संतुष्ट ।
निस्पृह वीतरागी ॥ २-८-२९ ॥

७ बोलण्यासारिखें चालणें ॥
स्वयें करुनें बोलणें
तयाची वचनें प्रमाणें
मानिती जनीं ॥ १२-१०-३९

८ जाणोन पाहिजेत सर्व
हेंचि तयाचें अपूर्व
ज्याचें त्यापरी गौरव
राखों जाणें ॥ १२-१-२० ॥

९ ऐसा गणेश मंगळमूर्ती ।
तो म्या स्तविला यथामती ॥
वांछा धरून चित्तीं ।
परमार्थाची ॥ १-२-३० ॥

१० अरे या आत्मयाची चळवळ पाहे ।
ऐसा भूमंडळीं कोण आहे ॥
अगाध पुण्यें अनुसंधान राहे ।
कांहीं एक ॥ १८-१-२२ ॥

११ कीं हा परलोकींचा निजस्वार्थु ।
कीं हा योगियांचा गुप्त पंथु ॥
नाना ज्ञानियांचा परमार्थु ।
रूपासि आला ॥ १-७-७ ॥

१२ म्हणोनी बोलतां चालतां ।
निचेष्टित पडिलें नस्तां ॥
मुक्ति लाभ सायोज्यता ।
सद्गुरुबोधें ॥ ७-६-४४ ॥

१३ लोहो परिसेसीं लागला ।
थेंबुटा सागरीं मिळाला ॥
गंगे सरिते संगम जाला ।
तत्क्षणीं ॥ ८-६-४३ ॥

१४ ऐसी सूक्ष्म स्थिति गती ।
कळतां चुके अधोगती ॥
सद्‌गुरुचेन सद्‌गती ।
तत्काळ होतें ॥ १९-५-३० ॥

१५ तेथें जाणीव राहिली ।
आणि जगज्जोती निमाली ॥
शुद्ध सारांश उरली ।
स्वरूपस्थिती ॥ १०-५-२६ ॥

१६ म्हणोनि सर्वसाक्षी मन ।
तेंचि जालिया उन्मन ॥
मग तुर्यारूप ज्ञान ।
तें मावळोन गेलें ॥ ७-५-११ ॥

७ सगुण भक्ति ते चळे ।
निर्गुण भक्ति ते न चळे ।।
हें आवघें प्रांजळ कळे ।
सद्गुरु केलियां ।।४-१०-३१।।

८ बहुत जनासी चालवी ।
नाना मंडळें हालवी ।।
ऐसी हे समर्थपद्वी ।
विवेकें होते ।।१८-१०-४६।।

९ उपासनेचा गजर ।
स्थळोस्थळीं थोर थोर ।।
प्रत्ययानें प्राणिमात्र ।
सोडविले ।।१५-२-२८।।

१० म्हणोनि सद्गुरु वर्णवेना ।
हे गे हेचि माझी वर्णना ।।
अंतरस्थितीचिया खुणा ।
अंतर्निष्ठ जाणती ।।१-४-३१।।

## २ ब्रम्हबोध

१ आदि अंतीं ब्रह्म निर्गुण ।
तेचि शाश्वताची खूण ॥
येर पंचभूतिक सगुण ।
नासिवंत ॥६-२-८॥

२ तो विश्रांतीचा विश्राम ।
आदिपुरुष आत्माराम ॥
तें येकाचि परब्रह्म ।
दुसरें नाहीं ॥७-२-५३॥

३ भ्रमरूप विश्व स्वभावें ।
तेथें काय म्हणोनि सांगावें ॥
निर्गुण ब्रह्मावेगळें आघवें ॥
भ्रमरूप ॥१०-६-३६॥

४ देव सदोदित संचला ।
लोकीं बहुविध केला ॥
परंतु बहुविध जाला ।
हें तों घडेना ॥९-३-३१॥

५ केलें तें अवघेचि लटिकें ।
तरी कर्ता हें बोलणेंचि फिकें ॥
वक्ता म्हणे रे विवेकें ।
बरें पाहा ॥ १३-८-३५ ॥
६ दृश्य हलकालोळें नेलें ।
जड चंचळ वितुळलें ॥
या उपरी शाश्वत उरलें ।
परब्रह्म तें ॥ १३-४-२४ ॥
७ जेथें ज्ञानाचि होतें विज्ञान ।
जेथें मनाचि होतें उन्मन ॥
तेथें कैचें चंचळपण ।
आत्मयासी ॥ १०-१०-५२ ॥
८ जेथें अज्ञान सरे ॥
ज्ञान तेंहि नुरे ॥
विज्ञानवृत्ति मुरे ।
परब्रम्ही ॥ ७-४-५१ ॥

९ ब्रम्ह जाणावें शाश्वत ।
माया तेचि अशाश्वत ॥
चौदा ब्रम्हांचा सिद्धांत ।
होईल आतां ॥ ७-३-२३ ॥

१० म्हणोनि हें दृश्यजात ।
आवघेंचि आहे अशाश्वत ॥
परमात्मा अच्युत अनंत ।
तो या दृश्यावेगळा ॥६-९-२२॥

११ मिथ्या शब्दीं कांहींच नाहीं ।
तेथें केलें कोणें काई ॥
करणें निर्गुणाचा ठाईं ।
हेंहि अघटित ॥८-२-५४॥

१२ भासाकारितां भास भासे ।
दृश्याकारितां दृश्य दिसे ॥
अदृश्यास उपमा नसे ।
म्हणोनि निरोपम ॥८-३-९॥

३ सकल उपाधीवेगळा ।
तो परमात्मा निराळा ॥
जळीं असोनि नातळे जळा ।
आकाश जैसे ॥ ६-५-२४ ॥
४ विवरोन पाहतां अष्टदेह ।
पुढें सहजचि निःसंदेह ।
अखंड निरुपणें राहे ।
समाधान ॥ १३-५-२३ ॥
५ ऐसा पंचभूतांचा विस्तार ।
नासिवंत हा निर्धार ॥
शाश्वत आत्मा निराकार ।
सत्य जाणावा ॥ १३-६-११ ॥
६ परा पश्यंती मध्यमा वैखरी ।
जेथें वोसरती च्यारी ॥
तेथें शब्दकाळाकुसरीं ।
कोण काज ॥ ९-२-२६ ॥

७ शब्द मौन्याचा विचार ।
व्हावया मूळ वोंकार ॥
तो वोंकार गेलिया उच्चार ॥
कैसा करावा ॥ ६-१०-३२ ॥

८ जिकडे जिकडे प्राणी पाहे ।
तिकडे तें सन्मुखाचि आहे ॥
समस्तांचे मस्तकीं राहे ।
माध्यानीं मार्तंड जैसा ॥२०-१०-५॥

९ आधीं दृश्य सोडिले ।
मग शून्यत्व वोलांडिले ॥
मूळ माये-परतें देखिलें ।
परब्रम्ह ॥ ८-१०-७० ॥

परब्रम्ह म्हणिजे सकळांपरतें ।
तयास पाहता आपणाचि तें ॥
हें कळे अनुभवमतें ।
सद्गुरु केलिया ॥ ९-१-२९ ॥

# ३ साधुबोध

१ पृथ्वीमध्यें बहुत जन ।
त्यामध्यें असती सज्जन ॥
परी साधूस जाणतो कोण ।
साधुवेगळा ॥ २०-३-२५ ॥

२ पतितपावनाचे दास ।
ते हि पावन करिती जगास ॥
ऐसी हे प्राचित मनास ।
बहुतांच्या आली ॥ १२-३-३३ ॥

३ सदा स्वरुपानुसंधान ।
हें मुख्य साधूचे लक्षण ॥
जनीं असोंन आपण ।
जनावेगळा ॥ ८-९-९ ॥

४ ब्रम्हज्ञानी आत्मज्ञानी ।
तत्त्वज्ञानी पिंडज्ञानी ॥
योग्याभ्यासी योगज्ञानी ।
उदासीन ॥ १-८-१५ ॥

५ जो जाणेल भगवंत ।
तया नांव बोलिजे संत ॥
जो शाश्वत आणि अशाश्वत ।
निवाडा करी ॥ ६-१-१६ ॥

६ ज्ञात्याची उगवली वृत्ती ।
बद्धाऐसी न पडे गुंती ॥
धाल्याची अनुभव प्राप्ती ।
भुकेल्यास नाहीं ॥ ९-७-५६ ॥

७ म्हणोनि सगुणभजन ।
वरी विशेष ब्रम्हज्ञान ॥
प्रत्ययाचे समाधान ।
दुर्लभ जगीं ॥ १०-७-३१ ॥

८ सांकडीमध्यें वर्तो जाणे ।
उपाधीमध्ये मिळों जाणे ॥
अलिप्तपणें राखों जाणे ।
आपणासी ॥ ११-६-१३ ॥

९ आपण विवेकें विशाळला ।
मर्यादेवेगळा जाला ॥
मग ब्रम्हगोळ देखिला ।
वटबीज न्यायें ॥ ९-९-३२ ॥

१० साध्य करावें साधनासी ।
ध्येयें धरावें ध्यानासी ॥
उन्मनें आवरावें मनासी ।
कोण्या प्रकारें ॥ ९-१०-३७ ॥

११ तैसा हरिदास आणि विरक्त ।
ज्ञाता आणि प्रेमळ भक्त ॥
व्युत्पन्न आणि वादरहित ।
तरी हे ही अपूर्वता ॥ १४-५-४ ॥

१२ या कारणें मनोगत ।
राखेल तो मोठा महंत ॥
मनोगत राखतां समस्त ।
वोढोन येती ॥ १३-१०-२९ ॥

१३ लोक संकल्प विकल्प करिती ।
ते अवघेचि निर्फल होती ॥
जनाची जना लाजवी वृत्ती ।
तऱ्हां योगेश्वर ॥ ११-१०-१५ ॥

१४ उदंड प्रगटला विचार ।
धर्मस्थापना तदनंतर ॥
तेथेच पूजेस अधिकार ।
पुण्यशरीरी ॥ १८-४-३६ ॥

१५ साधु निश्चय करिती एक ।
आत्मा सर्वत्र व्यापक ॥
येर हें अवघेंचि माइक ।
सचराचर ॥ ६-४-१३ ॥

१६ आत्माराम उपासना ।
तेणें पावले निरंजना ॥
निः सदेह अनुमाना ।
ठावचि नाहीं ॥ २०-६-३० ॥

१७ परमार्थ सकालांस विसांवा ।
सिद्ध साधु महानुभावां ॥
सेखी सात्विक जडजीवां
सत्संगें करुनी ॥ १-९-२० ॥

१८ विवेकें अंतरीं सुटला ।
वैराग्यें प्रपंच तुटला ॥
अंतर्बाह्य मोकळा जाला ।
निःसंग योगी ॥ १२-४-१२ ॥

१९ ज्ञाता तत्वें सांडून पळाला ।
तुर्ये पैलीकडे गेला ॥
आत्मनिवेदनें जाला ।
ब्रम्हरुप ॥ १८-९-२४ ॥

२० जें त्रैलोकीं नाहीं दान ।
तें करिती संतसज्जन ॥
तयां संताचें माहिमान ।
काय म्हणोनि वर्णावे ॥ १-५-२४

# ४ ईश्वरबोध

१ येक नाना प्रतिमा ।
दुसरा अवतार माहिमा ॥
तिसरा तो अंतरात्मा ।
चौथा निर्विकारी । ११-२-३३। (चत्वा.)

२ पिंडी देहधर्ता जीव ।
ब्रम्हांडी देहधर्ता शिव ॥
ईश्वर तनुचतुष्टय सर्व ।
ईश्वरधर्ता ॥ १३-१-२४ ॥

३ माया जाणिजे समीर ।
तींत जाणता तो ईश्वर ॥
ईश्वर आणि सर्वेश्वर ।
तयासीच बोलिजे ॥ १०-४-१६ ॥

४ येवं कल्पनेरहित ।
तया नांव भगवंत ॥
देवपणाची मात ।
तेथें नाहीं ॥ ८-१-५२ ॥

५ निश्चळ ब्रम्हीं चंचल आत्मा ।
सकळां पर जो परमात्मा ॥
चैतन्य साक्षी ज्ञानात्मा ।
षड्गुणैश्वरु ॥ १७-१-१ ॥

६ प्रकृतिपुरुष शिवशक्ती ।
अर्धनारीनटेश्वर म्हणती ॥
परी ते आवघी जगज्जोती ।
मूळ त्यासी ॥ १५-७-३ ॥

७ ते मुंगीसमान शरीरें ।
उदंड असती लहानथोरें ॥
समस्तांमध्यें जीवेश्वरें ।
वस्ती कीजे ॥ १५-८-५ ॥

८ ऐसा हा सविता सकळांचा ।
पूर्वज होय रघुनाथाचा ॥
अगाध महिमा मानवी वाचा ।
काय म्हणोनि वर्णावी ॥१६-२-१९॥

९ जीवात्मा शिवात्मा परमात्मा ।
जगदात्मा विश्वात्मा गुप्तात्मा ॥
आत्मा अंतरात्मा सूक्षात्मा ।
देव दानव मानवी ॥ १६-८-६ ॥

१० तस्मात् वाडिल अंतरात्मा ।
जेथें चेतला तेथें महिमा ॥
हें तो प्रगटचि आहे आम्हां ।
शब्द नाही ॥ १५-३-१९ ॥

११ ईश्वरें मोठें सूत्र केलें ।
मनुष्यमात्र गुंतोन राहिलें ॥
लोभाचें गुंडाळें केलें ।
उगवेना ऐसें ॥ १७-२-३० ॥

१२ आवरणोदकीं हटकेश्वर ।
त्यासी घडे नमस्कार ॥
महिमा अत्यंतचि थोर ।
तया पाताळ लिंगाचा ॥१७-१०-१॥

१३ सत्ता पृथ्वीमध्यें वांटली ।
जेथें तेथें विभागिली ॥
कळेनें सृष्टी चालिली ।
भगवंताचे ॥ २०-४-६ ॥

१४ त्या गुणामध्यें सत्त्वगुण ।
निखळ जाणीव लक्षण ॥
त्याचा देहधारी आपण ।
विष्णु जाला ॥ १०-९-१२ ॥

१५ जगदीश आहे जगदंतरी ।
चेटकें करावीं कोणावरी ॥
जो कोणी विवेकें विवरी ।
तोचि श्रेष्ठ ॥ १५-१-१० ॥

१६ नाना नामें भगवंताचीं ।
नाना ध्यानें सगुणाचीं ॥
नाना कीर्तनें कीर्तीचीं ।
अद्‌भुत करावीं ॥ १४-४-५ ॥

१७ धर्मस्थापनेचें नर ।
ते ईश्वराचे अवतार ॥
जाले आहेत पुढें होणार ।
देणें ईश्वराचें ॥ १८-६-२० ॥

१८ म्हणोनि थोराह्रूनि थोर ।
जे ईश्वराचा ईश्वर ॥
तयेसी माझा नमस्कार ।
तदंशेंचि आतां ॥ १-३-२६ ॥

१९ अकार उकार मकार ।
अर्धमात्रा तो ईश्वर ॥
ऐशा मात्रा चत्वार ।
चौदेहाच्या ॥ १७ ९-४ ॥

२० निर्गुण म्हाणिजे बहुगुण ।
बहुगुणी अंतरात्मा जाण ॥
सकळ त्याचे अंग हें प्रमाण ।
प्रचीत पाहा ॥ १६-९-४ ॥

# ५ जीवबोध

१ येच क्षणीं मरोन जासी ।
तरी रघुनाथीं अंतरलासी ॥
माझें माझें म्हणतोसी ।
म्हणोनिया ॥ ३-१०-५० ॥

२ निजेलें असतांचि मेले ।
पुन्हां उपजतांचि निजेले ॥
ऐसे आले आणि गेले ।
बहुत लोक ॥ ७-१-२४ ॥

३ वायोसारिसी वासना गेली ।
ते वायोरुपेंचि राहिली ॥
पुन्हां जन्म घेऊन आली ।
हेतुपरत्वें ॥ ९-८-५ ॥

४ गर्भी म्हणे सोहं सोहं ।
बाहेरी पडतां म्हणे कोहं ॥
ऐसा कष्टी जाला बहु ।
गर्भवासी ॥ ३-१-४७ ॥

५ जनाचा लालची स्वभाव ।
प्रारंभीच म्हणती देव ॥
म्हणिजे मजला कांहीं देव ।
ऐसी वासना ॥ १८-७-१ ॥

६ देह देऊळ आत्मा देव ।
कोठें धरुं पाहतां भाव ॥
देव वोळखोन जीव ।
तेथेंचि लावावा ॥ १४-८-२९ ॥

७ घटीं व्यापक जें आकाश ।
तया नांव घटाकाश ॥
पिंडीं व्यापक ब्रम्हांश ।
त्यास जीवात्मा बोलिजे ॥ ८-७-४९

८ ऐक्य जीव तो ब्रम्हांश ।
जेथें पिंड ब्रम्हांड निरास ॥
येथें सांगितला विशेष ।
चत्वार जीव ॥ ११-१-३५ ॥

९ मुख्य सच्छिष्याचें लक्षण ।
सद्गुरुवचनीं विश्वास पूर्ण ॥
अनन्य भावें शरण ।
त्या नांव सच्छिष्य ॥ ५-३-१९ ॥

१० सकळ उपदेशीं विशेष ।
आत्मज्ञानाचा उपदेश ॥
येविषयीं जगदीश ।
बहुतांठाईं बोलिला ॥ ५-४-३३ ॥

११ एक शुद्ध ज्ञानाचें लक्षण ।
शुद्धस्वरुपाचि आपण ॥
या नांव शुद्धस्वरु पज्ञान ।
जाणिजें श्रोतीं ॥ ५-६-१० ॥

१२ देहबुद्धिविवेकें वारी ।
आत्मबुद्धि सदृढ धरी ॥
श्रवण मनन केलाचि करी ।
या नांव साधक ॥ ५-९-८ ॥

१३ पिंडीं नित्यानित्य विवेक ।
ब्रम्हांडीं सारासार अनेक ॥
सकळ शोधूनियां एक ।
सार घ्यावें ॥ १८-५-३१ ॥

१४ धरितां सो सांडितां हं ।
अखंड चाले सोहं सोहं ॥
याचा विचार पाहतां बहु ।
विस्तारला ॥ १७-५-११ ॥

१५ ब्रम्हींचा अंश आकाश ।
आणि आत्म्याचा अंश मानस ॥
दोहींचा अनुभव प्रत्ययास ।
येथें घ्यावा ॥ २०-१-१८ ॥

१६ सोहं हंसा तत्वमसि ।
ते ब्रम्ह तूं आहेसी ॥
विचार पाहतां स्थिति ऐसी ।
सहजाचि होते ॥ १३-२-२० ॥

१७ ऐसें जाणोनियां जीवें ।
यांचें सार्थकाचि करावें ॥
जनीं मरोनि उरवावें ।
कीर्तिरुपें ॥ ३-९-४४ ॥

१८ संतकृपा होय जयास ।
तेणें उद्धारिला वंश ॥
तो ईश्वराचा अंश ।
सत्वगुणें ॥ २-७-७८ ॥

१९ परमेश्वरास वोळखिलें ।
आपण कोणसें कळलें ॥
आत्मनिवेदन जालें ।
म्हणिजे बरें ॥ १०–८–२२ ॥

२० तत्वांमध्यें मीपण गेलें ।
तरी निर्गुण सहजाचि उरलें ॥
सोहं-भावें प्रत्यया आलें ।
आत्मनिवेदन ॥ ६–३-३१ ॥

# ६ साधनबोध

१ सन्मार्ग तो जीवीं धरणें ।
अन मार्गाचा त्याग करणें ॥
संसारिका त्याग येणे ।
प्रकारें ऐसा ॥ ५-१०-२ ॥

२ स्वार्थ सांडून प्रपंचाचा ।
हव्यास धारिला परमार्थाचा ॥
अंकित होईन सज्जनाचा ।
म्हणे तो मुमुक्षु ॥ ५-८-४३ ॥

३ आळसाचें संरक्षण ।
परमार्थाचें बुडवण ॥
याकारणें नित्य श्रवण ।
केलेंचि पाहिजे ॥ ७-८-४१ ॥

४ म्हणोनि नित्यानित्यविचार ।
जेथें बोलिला सारासार ॥
तेचि ग्रंथ पैलपार ।
पाववी विवेकें ॥ ७—९—०६ ॥

५ हें आवघें आपणांपाशीं ।
येथें बोल नाहीं जनांसी ॥
सिकवावें आपल्या मनासी ।
क्षणक्षणा ॥ १२-२-२३ ॥

६ मुख्य हरिकथा निरुपण ।
दुसरें तें राजकारण ॥
तिसरें तें सावधपण ।
सर्वविषईं ॥ ११-५-४ ॥

७ आहे तितुकें देवाचें ।
ऐसें वर्तणें निश्चयाचें ॥
मूळ तुटे उद्वेगाचें ।
येणें रीति ॥ ११-३-२८ ॥

८ गुणमाया मूळमाया ।
परब्रम्हीं पावती लया ॥
तें परब्रम्ह विवराया ।
विवेक पाहिजे ॥ १४-९-१० ॥

९ पदार्थ जड आत्मा चंचळ।
विमळब्रम्ह ते निश्चळ ॥
विवरोन विरे तत्काळ।
तद्रूप होय ॥ १२-५-१५ ॥

१० निश्चळ चंचळ आणि जड ।
पिंडीं करावा निवाड ॥
प्रत्ययावेगळे जाड।
बोलणें नाहीं ॥ २०-७-१३ ॥

११ समजलें तरी उमजेना।
उमजलें तरी समजेना ॥
प्रत्ययेंवीण अनुमानेना।
सकळ कांहीं ॥ १५-५-१७ ॥

१२ सबळ विषय त्यागणें।
शुद्ध कार्याकारण घेणें
विषयत्यागाचीं लक्षणें।
वोळखा ऐसीं ॥ १२-७-२७ ॥

१३ श्रवणमननाचा विचार ।
निजध्यासें साक्षात्कार ॥
रोकडा मोक्षाचा उधार ।
बोलोंचि नये ॥ १७-३-३ ॥

१४ अखंड येकांत सेवावा ।
ग्रंथमात्र धांडोळावा ॥
प्रचीति येईल तो घ्यावा ।
अर्थ मनीं ॥ १८-३-२० ॥

१५ कांहीं गलबला कांहीं निवळ ।
ऐसा कंठीत जावा काळ ॥
जेणेंकरितां विश्रांती वेळ ।
आपणासि फावे ॥ १९-८-२९ ॥

१६ दुर्जन प्राणी समजावे ।
परी ते प्रगट न करावे ॥
सज्जनापरीस आळवावे ।
महत्त्व देउनी ॥ १९-९-२३ ॥

१७ अभ्यासें प्रगट व्हावें ।
नाहीं तरी झांकोन असावें ॥
प्रगट होऊन नासावें ।
हें बरें नव्हे ॥ १९-७-१७ ॥

१८ नमतेंपण सोंडूं नये ।
जाणपणें फुगों नये ॥
नानाजनाचें हृदये ।
मृदुशब्दें उकलावें ॥ १९-२-१० ॥

१९ पदार्थी असावें उदास ।
विवेक पाहावा विशेष सावकास ॥
येणेंकरितां जगदीश ।
अलभ्य लाभे ॥ १२-८-२१ ॥

२० शाहण्यानें ऐसें न करावें ।
सुख होय तेंचि करावें ॥
देवासी धुंडीत जावें ।
ब्रम्हांडापरतें ॥ १३-७-२६ ॥

# ७ प्रकृतिबोध

१ उपाधिवीण जें आकाश ।
तें ब्रम्ह निराभास ।।
ते निराभासीं मूळमायेस ।
जन्म जाला ।। १०-३-१ ।।

२ केवळ अचंचळीं निर्माण जाली ।
अधोमुखें बळें चालिली ।।
अखंड वाहे परी देखिली ।
नाहींच कोणी ।। ११-७-२ ।।

३ येथून पाहतां तेथवरी ।
चत्वार जिनस अवधारी ।।
येक चौदा पांच चारी ।
ऐसे आहे ।। २०-५-१ ।।

४ पुरुष इच्छेमध्ये प्रकृती ।
प्रकृतीमध्यें पुरुषव्यक्ती ।।
प्रकृतीपुरुष बोलती ।
येणें न्यायें ।। १६-७-४० ।।

५ भूतें गुण मेळविजे ।
त्यासी अष्टधा बोलिजे ॥
पंचभूतिक जाणिजे ।
अष्टधा प्रकृती ॥ ८–४–४२ ॥
६ च्यारी खाणी चारी वाणी ।
चौऱ्यांसी लक्ष जीवयोनी ॥
निर्माण जाले लोक तिनी ।
पिंडब्रम्हांड ॥ १३-३-१५ ॥
७ निर्विकल्प जें स्फुरण ।
उगेंच असतां आठवण ॥
तें जाणावें अंतःकरण ।
जाणतीकळा ॥ १७-८-४ ॥
८ किडामुंगीपासून ब्रम्हादिक ।
समस्तांत अंतःकरण एक ॥
ये गोष्टीचें कौतुक
प्रत्ययें जाणावें ॥ १०-१-२३ ॥

९ पृथ्वीचें मूळ जीवन ।
जीवनाचें मूळ दहन ॥
दहनाचें मूळ पवन ।
थोराहून थोर ॥ १६-४-३० ॥

१० ऐसा हा समर्थ पवन ।
हनुमंत जयाचा नंदन ॥
रघुनाथ स्मरणीं तनमन ।
हनुमंताचें ॥ १६-६-२४ ॥

११ जेंचि पिंडीं तेंचि ब्रम्हांडीं ।
प्रचीत नाहीं कीं रोकडी ॥
पंचभूतांची तांतडी ।
दोहींकडे ॥ ९-५-४०

१२ चौखाणींचे प्राणी असती ।
अवघे उदकेंचि वाढती ॥
ऐसे होती आणि जाती ।
असंख्यात ॥ १५-९-१ ॥

१३ येका उदकाचे विकार ।
पाहाता दिसती अपार ॥
पांचा भूतांचे विस्तार ।
चौऱ्यांसी लक्ष योनी ॥ ९-६-४३ ॥

१४ मनुष्यें मरतांच ऐका ।
कृमि भस्म कां मृत्तिका ॥
ऐशा काया पडती अनेका ।
पुढें पृथ्वी ॥ १५ ४-५ ॥

१५ ऐसा पृथ्वीचा महिमा ।
दुसरी काय द्यावी उपमा ॥
ब्रम्हादिकांपासुनी आम्हां ।
आश्रयोचि आहे ॥ १६-३-३० ॥

१६ पहिला देह स्थूळ काया ।
आठवा देह मूळ माया ॥
अष्टदेह निरसलियां ।
विचार कैचा ॥ ११-४-११ ॥

१७ भोवंडीनें पृथ्वी कलथली ।
कामिणीनें पिवळी जाली ॥
सान्निपातस्थां अनुभवली ।
तैसी माया ॥ १४-१०-२० ॥

१८ गुप्तरुपें गुणसौम्य ।
म्हणोनि बोलिजे गुणसाम्य ॥
सूक्ष्म संकेत अगम्य ।
बहुतांस कैंचा ॥ २०-२-२५ ॥

१९ साधुसंत महानुभाव ।
त्याचा हा ऐसा अनुभव ॥
पंचभूतातीत देव ।
सृष्टी मिथ्या ॥ ६-६-४७ ॥

२० सकळ माया गथागोवि ।
संतसंगे हे उशवावी ॥
पाविजे मोक्षाची पदवी ।
सत्समागमें ॥ ८-५-७० ॥

# ८ देहबोध

१ देहसंगे विषय भोगिले ।
देहसंगें प्राणी मिरवले ।
देहधत्यांस चुकले ।
नवल मोठे ॥ ११-८-१५ ॥

२ भक्तिहीन भावहीन ।
ज्ञानहीन वैराग्यहीन ॥
शांतिहीन क्षमाहीन ।
सर्वहीन क्षुल्लकु ॥ २-३-३७ ॥

३ नेणोनियां परमात्मा ।
सकळ पदार्थी प्रेमा ॥
बलात्कारें घाली जन्मा ।
ता रजोगुण ॥ २-५-३७ ॥

४ देवाची जो निंदा करी
तो आशाबद्ध अघोरी ॥
जो संतसंग न धरी ।
तो तमोगुण ॥ २-६-३७ ॥

५ देवद्रोही गुरुद्रोही ।
मातृद्रोही पितृद्रोही ॥
ब्रम्हद्रोही स्वामीद्रोही ।
तो एक मूर्ख ॥ २-१०-२३ ॥

६ नाहीं भक्तीचें साधन ।
नाहीं वैराग्य ना भजन ॥
क्रियेवीण बोले ब्रम्हज्ञान ।
तो एक पढतमूर्ख ॥ २-१०-२३ ॥

७ देह इंद्रिय आणि प्राण ।
यांचेनि योगें आपण ॥
सुखदुःखे सिणे जाण ।
या नांव आध्यात्मिक ॥३-६-१३॥

८ सर्व भूतांचेनि संयोगें ।
सुखदुःख उपजों लागे ॥
ताप होतां मन भंगे ।
या नांव अधिभौतिक ॥३-७-२॥

९ शुभाशुभ कर्मानें जना ।
देहांती यमयातना ॥
स्वर्ग नर्क भोग नाना ।
या नांव आधिदैविक ॥ ३-८-२ ॥

१० स्त्रीकारणें परमार्थ बुडविला ।
प्राणी स्वहितास नाडला ॥
ईश्वरीं कानकोंडा जाला ।
स्त्रीकारणें कामबुद्धी ॥ ३-२-५५ ॥

११ विषयसुख तें राहिलें ।
वांजपणें दुःखी केलें ।
तंव तें दैवत पावलें ॥
जाली वृद्धी ॥ ३-३-३४ ॥

१२ ऐसें आपुलें सुख पाहाती ।
परी त्याचें दुःख नेणती ॥
आणि शक्ती गेलिया अंती ।
कोणीच कामा न येती ॥ ३-४-२० ॥

१३ अविद्येनें अविद्या देखिली ।
म्हणोनी गोष्टी विश्वासली ॥
तुझी काया अवघी संचली ।
अविद्येची ॥ ६–८–४० ॥

१४ काया वाचा आणि मन ।
चित्त वित्त जीव प्राण ॥
द्रव्यदारेचें करी भजन ।
या नांव बद्ध ॥ ५-७-४१ ॥

१५ म्हणोनि मागुतें जन्मांतर ।
प्राप्त मातेंचे उदर ॥
संसार हा अतिदुस्तर ।
तोचि ठाकून आला ॥ ३-५-५५ ॥

१६ असो सकळ कळाप्रवीण ।
विद्यामात्र परिपूर्ण ॥
तरी ते कौशल्यता परी ज्ञान ।
म्हणोंचि नये ॥ ५-५-३२ ॥

१७ जनाचें समाधान राहावें ।
आपुलें पारिखें वोळखावें ॥
आणि भजनाचि मोडावें ।
हें कोण ज्ञान ॥ ६-७-१७ ॥

१८ येक (देह + आत्मा) अस्तां उदंड घडे ।
वेगळे पाहतां कांहींच न घडे ॥
विवेकें त्रिलोकी पवाडे ।
देहात्मयोगें ॥ १३-९-४० ॥

१९ देह परमार्थीं लाविलें ।
तरीच याचें सार्थक जालें ॥
नाहीं तरी हें वेर्थचि गेलें ।
नाना आघातें मृत्युपंथें ॥१-१०-६१॥

२० आपणास नुमजे बरवें ।
म्हणोनि मिथ्या कैसें म्हणावें ॥
ना तरी सदृढ धरावें ।
सद्गुरुमुखें ॥ ७-७-४१ ॥

# ९ विहितकर्मबोध

१ वाल्मीक ऋषी बोलिला नसता ।
तरी आम्हांसी कैंची रामकथा ॥
म्हणोनियां समर्था ।
काय म्हणोनी वर्णावें ॥१६-१-१८॥

२ ऐसा ग्रंथ जपोनी ल्याहावा ।
प्राणिमात्रांस उपजे हेवा ॥
ऐसा पुरुष तो पाहावा ।
म्हणती लोक ॥१९-१-१२॥

३ जगीं भेद कामा नये ।
वर्ण संकर करूं नये ॥
आपला धर्म उडवूं नये ।
अभिमान खोटा ॥१४-१-७६॥

४ आधीं कर्माचा प्रसंग ।
कर्म केले पाहिजे सांग ॥
कदाचित पडिले व्यंग ।
तरी प्रत्यवाय घडे ॥११-९-१॥

५ ज्या इंद्रियांस जो भोग ।
तो तो करी यथासांग ॥
ईश्वराचें केलें जग (भेदयुक्त) ।
मोडितां उरेना ॥१७-४-२८॥

६ कर्मविधी उपासनाविधी ।
ज्ञानविधी वैराग्यविधी ॥
विशाळ ज्ञातृत्वाची बुद्धी ।
चळेल कैसी ॥१९-४-२०॥

७ प्रपंच अथवा परमार्थ ।
जाणता तोचि समर्थ ॥
नेणता जाणिजे व्यर्थ ।
निःकारण ॥९-४-१९॥

८ अपकीर्ति ते सांडावी ।
सत्कीर्ति वाढवावी ।
विवेकें दृढ धरावी ।
वाट सत्याची ॥ २-२-४१॥

९ प्रातःकाळीं उठत जावें ।
प्रातः स्मरामि करावें ॥
नित्यनेमें स्मरावें ।
पाठांतर ॥१२-९-९॥

१० नरदेहीं विशेष ब्राम्हण ।
त्याहीवरी संध्यास्नान ॥
सद्वासना भगवभ्दजन ।
घडे पूर्वपुण्यें ॥२-४-२॥

११ ब्राम्हणास तनुमनु ।
सूर्यदेव हुताशनु ॥
येतद्विषई अनुमानु ।
कांहींच नाहीं ॥१६-५-१७॥

१२ असो ऐसा भगवभ्दक्त ।
जो ये संसारीं विरक्त ॥
तयास मानिती मुक्त ।
साधुजन ॥ १४-३-३३॥

१३ येणेंचि न्यायें अन्नवसन ।
येणेंचि न्यायें देवतार्चन ॥
येणेंचि न्यायें ब्रम्हज्ञान ।
प्राप्तव्यासारिखें ॥१७-६-२४॥

१४ उत्तम संगती धरावी ।
आपली आपण चिंता करावी ।
अंतरी बरी विवरावी ।
बुद्धि जाणत्याची ॥१७-७-१२॥

१५ विरक्तें उत्तम गुण घ्यावे ।
विरक्तें अवगुण त्यागावे ॥
नाना अपाय भंगावे ।
विवेकबळें ॥२-९-३१॥

१६ कांहीं नेमकपण आपुलें ।
बहुतजनासी कळों आलें ॥
तेंचि मनुष्य मान्य जालें ।
भूमंडळी ॥१९-३-२३॥

१७ संतासंत जे जन ।
तेथें कोरान्न मागोन करी भोजन ॥
तेणें केलें अमृतप्राशन ।
प्रतिदिनीं ॥ १४-२-३ ॥

१८ भूमंडळीं सकळांसी मान्य ।
तो म्हणों नयें सामान्य ॥
कित्येक लोक अनन्य ।
तया पुरुषासी ॥ १५-६-२९ ॥

१९ अध्यात्मश्रवण करीत जावें ।
म्हणिजे सकळ कांहीं फावें ॥
नाना प्रकारींचें गोंवे ।
तुटोनि जाती ॥ २०-९-१८ ॥

२० कांहीं अनुमानलें विचारें ।
देव आहे जगदंतरें ॥
सगुणाकरितां निर्धारें ।
निर्गुण पाविजे ॥ १८-८-२२ ॥

## १० भक्तिबोध

१ सर्व प्रकारें नेमक ।
शास्त्रोक्त करणें कांहींयेक ॥
त्याहीमध्यें अलोकिक ।
तो हा भक्तिमार्ग ॥ १४-७-६ ॥

२ वेद शास्त्रें आणि पुराणें ।
माहावाक्यांचीं विवरणें ॥
तनुचतुष्टयानिर्शनें ।
कैसीं तें ऐकावी ॥ ४-१-२९ ॥

३ सगुणकथा या नांव कीर्तन ।
अद्वैत म्हणिजे निरुपण ॥
सगुण रक्षून निर्गुण ।
बोलत जावे ॥ ४-२-२३ ॥

४ चालतां बोलतां धंदा करितां ।
खातां जेवितां सुखी होतां ॥
नाना उपभोग भोगितां ।
नाम विसरों नये ॥ ४-३-७ ॥

५ पादसेवन(सद्‌गुरुपाय) चौथी भक्ती।
पावन करीतसे त्रिजगतीं ॥
जयेंकरितां सायुज्यमुक्ती ।
साधकास होये ॥४-४-२५॥

६ कायावाचा आणि मनें।
चित्तें वित्तें जीवें प्राणें॥
सद्‌भावें भगवंत अर्चणें ।
या नांव अर्चनभक्ती ॥४-५-२९॥

७ सर्व देवांस नमस्कारिलें।
ते येका भगवंतास पावलें॥
येदर्थीं येक वचन बोलिलें
आहे तें ऐका॥(आकाशात्पतितं)॥४-६-११॥

८ सातवें भजन तें दास्य जाणावें
पाडिलें कार्य तितुकें करावें॥
सदा सन्निधचि असावें।
देवद्वारीं ॥ ४-७-२ ॥

९ देवाच्या सख्यत्वाकारणें ।
आपलें सौख्य सोडून देणें
अनन्य भावे जीवें प्राणें ।
शरीर तेंही वेचावें ॥४-८-६

१० त्वंपद तत्पद असिपद ।
निरसुनि सकळ भेदाभेद ॥
वस्तु ठाईंचि अभेद ।
आपण कैचा ॥ ४-९-२० ॥

११ आत्मनिवेदनाचे अंतिं
जे कां घडली अभेद भक्ती ॥
तया नांव सायोज्यमुक्ती
सत्य जाणावी ॥ ८-८-१९ ॥

१२ उपासनेचें सेवटीं ।
देवांभक्तां अखंड भेटी ॥
अनुभवी जाणेल गोष्टी ।
प्रत्ययाची ॥ १८-२-३० ॥

१३ उपासनेचें उत्तीर्ण व्हावें
भक्तजनें वाढवावें ॥
अंतरीं विवेकें उमजावें ।
सकळ कांहीं ॥ १५-१०-३३ ॥

१४ शाहाणे करावे जन ।
पतित करावे पावन ॥
सृष्टीमध्यें भगवद्भजन ।
वाढवावें ॥ १४-६-३३ ॥

१५ उत्कट भक्ति उत्कट ज्ञान ।
उत्कट चातुर्य उत्कट भजन ॥
उत्कट योग अनुष्ठान ।
ठाईं ठाईं ॥ १९-६-२२ ॥

१६ आद्य मध्य अवसान ।
जे शाश्वत निरंजन ॥
तेथें लावावें अनुसंधान ।
जाणते पुरुषीं ॥ १२-६-१० ॥

१७ आपण करावें करवावें ।
आपण विवरावें विवरवावें ॥
आपण धरावें धरवावें ।
भजनमार्गासी ॥ १९-१०-१७ ॥

१८ आवाहन विसर्जन ।
हेंचि भजनाचें लक्षण ॥
सकळ जाणती सज्जन ।
१९ मी काय सांगों ॥ २०-८-३० ॥

भजन साधन अभ्यास ।
येणें पाविजे परलोकास ॥
दास म्हणे हा विश्वास ।
२० धरिला पाहिजे ॥ १६-१०-३१ ॥

भक्तिचेन योगे देव ।
निश्चयें पावती मानव ।
ऐसा आहे अभिप्रावें
इये ग्रंथीं ॥ -१-१-४ ॥

श्री गुरुः शरणम्

श्रोते पुसती कोण ग्रंथ
काय बोलिले जी येथे
ग्रंथानाम दास बोध
गुरु शिष्यांचा संवाद
विवरता विशेषा विशेष
कळो लागे

कै. ति. दादांच्या मद्रास येथील मुक्कामात एका निष्ठावंत साधक गुरुभक्तांचे सहवासात झालेल्या विचार मंथनातून हे अमृत कण वेचुन घेतले व त्यांच्याच सुवाच्य हस्ताक्षरात त्याचे संकलन झालेले आहे

प्रकाशक निमित्त मात्र आहे हा योगायोग !

भक्ताचे नि साभिमानाने ।। कृपाकेली दाशरथिने ।। समर्थ कृपेची वचने तो हा दासबोध (दशबोध)

श्री. केशव गोखले मिरज

# विव्दत् सत्कार समिती

## प्रकाशने

1) **स्वाध्याय मनोबोध**

भाग १ ला

( आवृत्ती संपली )

( कै. डॉ. दादासाहेब प्राणी )

२) **भारुड संकीर्तने**

( ह. भ. प. हरेरामपंत बोडस )

3) **स्वाध्याय मनोबोध**

भाग २ रा

(कै. डॉ. दादासाहेब प्राणी)

४) **श्री दासबोधांतर्गत दशबोध**

( कै. डॉ. दादासाहेब प्राणी )

REFBK-0022525
REFBK-0022525
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 23e9 २०८५
22525
संदर्भ शाखा